# अदाणी इलेक्ट्रिसिटीकडून मुंबईतील ग्राहकांसाठी हरित ऊर्जा सादर

■ **मुंबई**

मुंबईची सर्वात मोठी वीज वितरण कंपनी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) मुंबईच्या हरित ऊर्जा परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे . सर्व ग्राहकांना अपारंपरिक ऊर्जेसाठी त्यांचे लक्ष्य ठरवण्याचे स्वातंत्र्य एईएमएल सादर करत असलेल्या मुंबई हरित ऊर्जा उपक्रमामुळे (ग्रीन एनर्जी इनिशिएटिव्ह) मिळणार आहे .

एईएमएल शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहे आणि पॅरिस करारा अंतर्गत भारताने मान्य केलेल्या अपारंपारिक ऊर्जेचे जे लक्ष्य मान्य केले आहे ते साध्य करण्यास वचनबद्ध आहे. एईएमएल २०२३ पर्यंत अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून ३० टक्क्यांहून अधिक ऊर्जा आवश्यकतांची पूर्तता करणार आहे. मईआरसीकडून अगोदरच मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून ही क्षमता ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात येणार आहेत्यासाठी १,००० मेगावॅट ऊर्जा खरेदीचा प्रस्ताव एमईआरसी ला सादर करण्यात आला आहे यापैकी ५१ टक्क्याहून अधिक ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतांकडून खरेदी करण्यात येणार आहे . एईएमएल ग्राहक पुढील गोष्टींचा लाभ घेऊ शकतात:

१. अतिरिक्त ६६ पैसे भरुन एमईआरसीने घोषणा केलेल्या योजनेप्रमाणे १०० टक्के अपारंपरिक ऊर्जा खरेदी करू शकतात.

२. एईएमएल ग्राहकांना अपारंपरिक ऊर्जा (आरई) प्रमाणपत्रे देईल. वित्तीय वर्ष २०२२-२३च्या अखेरपर्यंत राजस्थानमधील संकरित सौर व पवन ऊर्जा प्रकल्पातून एईएमएल ला ७०० मेगावॅट ऊर्जा पुरवठा मिळेल. याशिवाय अतिरिक्त १,००० मेगावॅट ऊर्जा खरेदीचा प्रस्ताव एमईआरसीला पाठवण्यात आला आहे ज्यात बहुतांश ऊर्जा हि अपारंपरिक स्रोतातून मिळवण्यात येईल .

एमईआरसीच्या आदेशानुसार एईएमएलचे ग्राहक (महाराष्ट्रातील इतर सर्व वितरण कंपन्यान प्रमाणे) प्रति युनिट ६६ पैसे अतिरिक्त दर देऊन त्यांच्या ऊर्जा गरजांची पूर्तता १००% अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून पूर्ण करू शकतात एईएमएलचा नवीन उपक्रम जगभर व्याप असलेल्या ग्राहकांना उपयुक्त ठरेल.

ज्या ग्राहकांनी आपल्या ऊर्जा गरजे पैकी २५% किंवा अधिक ऊर्जा अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे त्यांना हे ध्येय आरई प्रमाणपत्रांच्या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकते. हे नाविन्यपूर्ण पाऊल त्यांच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांची पूर्तता करण्याकरिता उपयुक्त ठरू शकते.

मुंबई हरित ऊर्जा उपक्रमाच्या माध्यमातून एईएमएलचे कॉर्पोरेट ग्राहक प्रत्यक्ष अपारंपरिक ऊर्जा पुरवठा व अप्रत्यक्ष ऑफसेट्सच्या संयोजनाच्या माध्यमातुन त्यांच्या शाश्वत विकासाच्या मुंबई, देश आणि जागतिक पातळीवरील ध्येयांच्यी पुर्तता करण्यासाठी सक्षम ठरतील.

ईएमएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक कंदर्प पटेल म्हणाले, ''कंपनीने त्यांच्या अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांमध्ये लक्षणीय वाढ केलेली असून एईएमएल ग्राहकांना त्यांच्या ऊर्जेचा स्रोत निवडण्यामध्ये हि वाढ सक्षम करेल, ज्यामुळे हरित इलेक्ट्रॉन्स प्रत्येकासाठी उपलब्ध होतील आणि हरित ऊर्जा परिवर्तनाला चालना मिळेल. आम्ही कोणतेही बदल किंवा अडथळ्याशिवाय मुंबईमध्ये १०० टक्के हरित ऊर्जा पुरवठा व प्रमाणपत्रे मिळण्याची खात्री देऊ शकतो. आम्ही अपारंपरिक ऊर्जा संधींचा पूर्णपणे लाभ घेण्यासाठी आणि त्यांची शाश्वत विकास ध्येये संपादित करण्यासाठी सर्व ग्राहकांकरिता अनुकूल अपारंपरिक ऊर्जा पर्यायाची निर्मिती करू.'' मुंबई हरित उर्जा उपक्रम (मुंबई ग्रीन एनर्जी इनिशिएटिव्ह) हा पूर्णपणे ऐच्छिक उपक्रम आहे आणि एईएमएलच्या सर्व विद्यमान व संभाव्य ग्राहकांसाठी खुला आहे. सर्व विद्यमान व नवीन ग्राहक सहभाग घेण्यासाठी पात्र आहेत. एईएमएल अपारंपरिक ऊर्जेच्या स्रोतातून पुर्तता करण्यात आलेल्या ऊर्जा आवश्यकतेची टक्केवारी (%) सांगणारी मासिक प्रमाणपत्रे ग्राहकां देण्यात येतील.

एईएमएल ग्राहकांना शाश्वत भविष्यासाठी या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन करते. अपारंपरिक ऊर्जेशी १०० % कटिबद्ध असलेल्या जगातील सर्वात परिणामकारक व्यवसायांना एकत्र आणणारा आरई१०० उपक्रमाच्या च्या सर्व सदस्यांचे स्वागत करते.

एईएमएल ग्राहकांना किफायतशीर, विश्वसनीय व स्थिर वीज पुरवठा देण्यासाठी कटीबद्ध आहे. निवासी, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांच्या वैविध्यपूर्ण समूहाला सेवा देणा-या एईएमएलला प्रत्येक वैयक्तिक ग्राहकाच्या गरजांची माहिती आहे.